॥ न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥

Ainpur Parisar Shikshan Prasarak Mandal's

# SARDAR VALLABHBHAI PATEL ARTS & SCIENCE COLLEGE, AINPUR

1993

सत्यमेव जयते

NAAC RE-ACCREDITED (2nd CYCLE)

# सरदार वल्लभभाई पटेल

## कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर

ता. रावेर, जि. जळगांव (महाराष्ट्र)

**NAAC Re-Accredited (2nd Cycle) & ISO 9001:2015**

*Affiliated to*

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

E-Mail : svpca123@yahoo.com | www.ainpurcollege.ac.in






QUALITY EDUCATION | HOLISTIC DEVELOPMENT | RURAL UPLIFTMENT & SUSTAINABILITY | RESEARCH & INNOVATION | SOCIAL COMMITMENT & INTEGRITY

# माहिती पत्रक

## २०२६ - २०२७

# PROSPECTUS

*Empowering Rural Youth • Enriching Lives • Building the Nation*

ESTD. 1993

।। न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।।

Ainpur Parisar Shikshan Prasarak Mandal's

# SARDAR VALLABHBHAI PATEL ARTS & SCIENCE COLLEGE, AINPUR

**NAAC Re-Accredited (2nd Cycle)**

**Affiliated to: Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

## VISION

Sustainable Socio-economic development of rural masses through education

## MISSION

To provide relevant higher education to the rural students to groom them to be a responsible citizen, who will bear torch for disseminating knowledge in the rural masses and sustainable socio - economic development of the society with preservation of environment.

## GOALS & OBJECTIVE

- To provide higher education for rural masses.
- To inculcate and uplift the educational level of poor and backward students.
- To link the rural masses in the age of globalization.
- To aware and create social harmony and national integration amongst students.
- To aware environmental crisis and work to minimize environmental disorders.

# Ainpur Parisar Shikshan Prasarak Mandal

## Management Committee 2021-2026

| Sr. No. | Name | Designation |
|---|---|---|
| 1 | Shri. Bhagawat Vishwanath Patil | President |
| 2 | Shri. Ramdas Narayan Mahajan | Vice-President |
| 3 | Shri. Shriram Narayan Patil | Chairman |
| 4 | Shri. Sanjay Waman Patil | Secretary |
| 5 | Shri. Hari Bhika Patil | Member |
| 6 | Shri. Sudesh Eknath Patil | Member |
| 7 | Shri. Pravin Gambhir Mahajan | Member |
| 8 | Shri. Jagannath Shamu Patil | Member |
| 9 | Shri. Pralhad Madhukar Patil | Member |
| 10 | Shri. Vikas Dattatraya Mahajan | Member |
| 11 | Shri. Narendra Vitthal Patil | Member |
| 12 | Shri. Dr. Satish Bhagwat Patil | Member |
| 13 | Shri. Vijay Jagannath Patil | Member |
| 14 | Shri. Prakash Rajaram Chaudhari | Member |
| 15 | Shri. Kailas Kadu Patil | Member |
| 16 | Shri. Ramdas Shivram Patil | Joint Secretary |
| 17 | Shri. Dr. Jaswant Baburao Anjane | Principal |

# Sardar Vallabhbhai Patel Arts & Science College
# Ainpur, Tal-Raver, Dist-Jalgaon

## College Development Committee

| Sr. No. | Name | Designation |
|---|---|---|
| 1 | Shri. Bhagawat Vishwanath Patil *(President APSPM'S)* | President |
| 2 | Shri. Sanjay Waman Patil *(Secretary APSPM'S)* | Member |
| 3 | Dr. S. N. Vaishnav *(IQAC Co-ordinator)* | Member |
| 4 | Prof. H. M. Baviskar *(Teacher-Representative)* | Member |
| 5 | Prof. S. P. Umriwad *(Teacher Representative)* | Member |
| 6 | Dr. V. N. Ramteke *(Teacher Representative)* | Member |
| 7 | Shri. Gopal N. Patil *(Non-Teaching representative)* | Member |
| 8 | Shri. Ravindra G. Patil *(Industrialist)* | Member |
| 9 | Shri. Dilip G. Patil *(Educationalist)* | Member |
| 10 | Shri. Pandurang Bajirao Patil *(Representative of Society)* | Member |
| 11 | Shri. Sumit D. Patil *(Alumni Representative)* | Member |
| 12 | Prof. S.B. Mahajan *(HOD Representative)* | Member |
| 13 | (Vacant) *(Student Council President)* | Member |
| 14 | (Vacant) *(Student Council Secretary)* | Member |
| 15 | Principal Dr. J.B. Anjane | Secretary |

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना १९९३ मध्ये करण्यात आली. आरंभापासूनच विद्यार्थी हा ज्ञानरुपी सागराचा एकमेव केंद्रबिंदू मानून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व उज्वल भवितव्यासाठी महाविद्यालय ग्रामीण भागात वसलेले असतांना सुद्धा शिक्षण प्रसाराचे अनमोल कार्य करीत आहे. महाविद्यालयात नेहमीच शैक्षणिक व शिक्षणाला पुरक अभ्यासक्रम व उपक्रम राबविले जातात. आतापर्यंत महाविद्यालयाने झपाट्याने संख्यात्मक व गुणात्मक प्रगती साधलेली आहे.

**महाविद्यालयाची वैशिष्ट्ये**

- सन २०१२ मध्ये उत्तर महाराष्ट्र विद्यापिठातर्फे उत्कृष्ठ महाविद्यालय पुरस्कार प्राप्त.
- मेहनती व अनुभवी प्राध्यापक वर्ग.
- मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी प्राधान्य.
- नापास विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन.
- विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी विद्यार्थी तक्रार निवारण समिती.
- रॅगिंग प्रतिबंधासाठी दक्षता समिती.
- वर्षभर विविध विषयांवर शिक्षणतज्ञांचे व्याख्यान आयोजन.
- विद्यार्थ्यांतील सुप्त कला गुणांना वाव देण्यासाठी विविध मंडळे कार्यरत.
- विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी प्रोत्साहनपर बक्षीसे व शिष्यवृत्ती योजना.
- स्पर्धा परीक्षांसाठी विशेष मार्गदर्शन.
- महाविद्यालयात व्यवसाय मार्गदर्शन, समुपदेशन केंद्र तसेच समान संधी केंद्र सुरु करण्यात आलेले आहे.

## माहितीचा अधिकार

केंद्रीय माहितीचा अधिकार कायदा २००५ नुसार गठित समिती

- डॉ. जे. बी. अंजने (प्राचार्य) - अपिलीय अधिकारी
- प्रा. डॉ. एस.एन. वैष्णव (उपप्राचार्य) - माहिती अधिकारी
- प्रा. डॉ. एस. ए. पाटील (सहयोगी प्राध्यापक) - सहाय्यक माहिती अधिकारी

## संलग्नीकरण

महाविद्यालय कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव या विद्यापिठाशी संलग्नित असून महाविद्यालयास कायम संलग्नीकरण प्राप्त झाले आहे. तसेच विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) कायदा १९५६ च्या कलम २ (f) व १२ (B) ची मान्यता महाविद्यालयास प्राप्त असून त्यानुसार मिळणाऱ्या विविध अनुदानास महाविद्यालय पात्र आहे.

## प्राध्यापक वृंद / शिक्षकेतर कर्मचारी

महाविद्यालयात एकूण ३३ प्राध्यापक व ११ शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत. सर्व प्राध्यापक आपल्या विषयात अनुभवी व तज्ञ आहेत. महाविद्यालयात प्रवेश घेणारे बहुसंख्य विद्यार्थी ग्रामीण भागातील असल्यामुळे त्यांच्याकडे त्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी व्यक्तिगत लक्ष दिले जाते.

## ज्ञानस्त्रोत केंद्र (ग्रंथालय)

ग्रंथालय संगणकीकरणासाठी SOUL 3.0 हे सॉफ्टवेअर घेण्यात आलेले आहे. ग्रंथालयाचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांजवळ स्वतःचे ओळखपत्र असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी अभ्यासिकेची सोय उपलब्ध आहे. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांना तसेच गावातील वाचक, जेष्ठ नागरिकांना ग्रंथालयाचा उपयोग घेण्याची सुविधा उपलब्ध आहे. ग्रंथालयात वाचन कक्षाचा उपयोग विद्यार्थी सकाळी ७:३० ते दुपारी २:३० वाजेपर्यंत करु शकतात. तसेच परीक्षाकाळात वाचनकक्षाची वेळ संध्याकाळी ५ वाजेपर्यंत असते.

**ग्रंथालय सेवा :-**

१) पुस्तक देव घेव
२) संदर्भ सेवा
३) स्वतंत्र वाचनकक्ष
४) मुक्तद्वार प्रवेश पद्धती
५) इंटरनेटसह संगणक कक्ष (ई-ग्रंथालय)
६) झेरॉक्स सुविधा
७) आंतरग्रंथालय देवघेव सुविधा
८) पुस्तक पेढी योजना
९) ग्रंथप्रदर्शन, उद्बोधनवर्ग, ग्रंथालय तासिका, सामान्यज्ञान परीक्षेचे आयोजन
१०) उत्कृष्ट ग्रंथालय वाचक पुरस्कार
११) रोजगार विषयक बातम्यांचे स्वतंत्र सुचना फलक.

**ग्रंथालयाचे नियम :-**

१) ग्रंथालयातील सेवा सुविधांचा वापरासाठी प्रत्येक ओळख पत्रावर संगणकीकृत बारकोड प्रणाली कार्यान्वित केलीली असून ग्रंथालयात प्रवेश करतांनाच विद्यार्थ्यांनी त्याची उपस्थिती नोंद बारकोड स्कॅनर वर करणे आवश्यक आहे.
२) कोणत्याही विद्यार्थ्यास ओळखपत्राशिवाय ग्रंथालयात प्रवेश मिळणार नाही व ग्रंथालयाचा उपयोग घेता येणार नाही. ओळखपत्र हरविल्यास त्वरीत ग्रंथालयात लेखी कळवावे.
३) ग्रंथालयाने विद्यार्थ्यांसाठी ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसारच पुस्तकांची देवाण घेवाण करण्यात येईल.
४) ग्रंथालयाची पुस्तके परतीच्या तारखेस जमा न केल्यास नियमानुसार दंड आकारला जाईल.
५) ग्रंथालयाची पुस्तके व्यवस्थित वापरावी व पुस्तकातील पानांवर कुठल्याही प्रकारचे लिखाण करु नये.
६) वाचन कक्षात विद्यार्थ्यांनी शांतता बाळगावी. वाचन कक्षात भ्रमणध्वनी वापरल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
७) पुस्तक हरवल्यास तेच पुस्तक नवीन आणून द्यावे लागेल किंवा नियमानुसार त्याची दुप्पट किंमत दंडासह वसुल केली जाईल.
८) ग्रंथ (पुस्तक) शोधण्यासाठी संगणीकृत OPAC प्रणालीचा वापर करावा.
९) वाचन कक्षातील वातावरण शांततामय राहील याची विद्यार्थ्यांनी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी वेळोवेळी देलेल्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक आहे.

## क्रीडा आणि जिमखाना विभाग

महाविद्यालयात विद्यार्थ्यांना विविध खेळांचे प्रशिक्षण दिले जाते. महाविद्यालयाचे खेळाडू विविध स्तरावर महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करत आले असून विविध खेळांचे मैदानावर विद्यार्थ्यांचा सराव करून घेतला जातो. यासाठी प्रशस्त खेळाचे मैदान असून स्वतंत्र Indoor sports Hall व जिमखाना आहे. हॉलीबॉल, सॉफ्टबॉल, बास्केट बॉल तसेच बॅडमिंटन कोर्ट उपलब्ध असून विद्यार्थी नियमित त्यावर खेळाचा सराव करतात.

## प्रवेशासंबंधी माहिती व नियम

१) प्रवेश संबंधी व महाविद्यालयाविषयी सर्व माहिती व नियम माहिती पत्रकात दिलेले आहे. सदर प्रवेश अर्ज आपण ऑनलाईन पध्दतीने सादर करुन व Gateway ने प्रवेश फी भरावी. माहितीपत्रक व इतर अर्ज महाविद्यालयाच्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

२) ऑनलाईन भरलेले अर्ज व आवश्यक ती कागदपत्रे कार्यालयात जमा करावी, त्यानंतरच आपला प्रवेश निश्चित करण्यात येईल.

३) प्रवेश अर्जासोबत जोडावयाची मुळ प्रमाणपत्रे व त्यांच्या प्रमाणित सत्यप्रती प्रवेश घेत असतांना आणणे आवश्यक आहे. जास्तीच्या झेरॉक्स सत्यप्रती विद्यार्थ्यांनी आपल्याजवळ राखून ठेवाव्यात एकदा जमा केलेल्या प्रती कार्यालयातून झेरॉक्स काढण्यासाठी मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

४) प्रवेश अर्जावर पासपोर्ट साईजचा कलर फोटो लावणे आवश्यक आहे.

५) संगणकाद्वारे तयार झालेले पात्रता अर्ज (Eligibility form) काळजीपूर्वक अभ्यासून त्यावर विद्यार्थ्याने सही करणे आवश्यक आहे.

६) स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate)

A. एकाच विद्यापीठाच्या एका महाविद्यालयातून दुसऱ्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा असेल तर स्थलांतर प्रमाणपत्र द्यावे लागते. महाविद्यालय सोडल्यानंतर योग्य ती फी भरुन त्या महाविद्यालयाकडून हे प्रमाणपत्र मिळते.

B. एका विद्यापीठाच्या महाविद्यालयातुन दुसऱ्या विद्यापीठाच्या महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा असल्यास स्थलांतर पत्र द्यावे लागते. प्रवेश घेतल्यापासून एक महिन्याच्या आत हे प्रमाणपत्र महाविद्यालयाच्या कार्यालयात आणून द्यावे लागते.

७) शाळा सोडल्याचा दाखला (School Leaving Certificate) एच. एस. सी. (१२ वी) किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना हा शाळा सोडल्याचा दाखला प्रवेश अर्जासोबत दाखल करावा लागतो.

८) महाविद्यालय सोडल्याचा दाखला (Transfer Certificate) विद्यार्थ्याने महाविद्यालयातील शिक्षण पूर्ण केल्यास अथवा त्याने मागणी केल्यानुसार त्यास (T.C.) दिले जाते. एकाच विद्यापीठ क्षेत्रातील एका महाविद्यालयातून नाव कमी करून दुसऱ्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा असल्यास हा दाखला द्यावा लागतो.

९) प्रवेश अर्ज बिनचूक व संपूर्ण भरुन तो शाखानिहाय गठित केलेल्या प्रवेश समितीकडून तपासून घ्यावा व माहितीपत्रकातील फी चा तक्ता पाहून फी भरावी.

१०) फी सवलती / स्कॉलरशीप / इ. साठी मुदतीत अर्ज न केल्यास ती न मिळाल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्याची राहील. काही कारणास्तव सवलत नामंजूर झाल्यास फी भरावी लागेल.

११) अपूर्ण प्रवेश अर्ज स्वीकारला जाणार नाही. तसेच पूर्ण फी भरल्याशिवाय प्रवेश निश्चित होत नाही यांची नोंद घ्यावी.

१२) प्रवेश अर्ज व फी स्वीकारल्यानंतर देखील प्रवेश देण्याचा अंतिम निर्णय प्राचार्यांचा राहील.

१३) प्रवेश घेतल्यापासून १० दिवसांच्या आत ५०/- रु. फी भरुन एकदाच विषय बदल करता येईल.

१४) ओळखपत्र :- महाविद्यालयात प्रत्येक विद्यार्थ्यांजवळ आपले ओळखपत्र असणे आवश्यक आहे. प्रवेश निश्चित केल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत ओळखपत्र तयार करणे बंधनकारक आहे. मुदतीनंतर ओळखपत्र तयार केल्यास ५०/- रुपये अतिरिक्त द्यावे लागतील.

१५) वैद्यकीय तपासणी : विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे प्रथम वर्षातील सर्व विद्यार्थ्यांना वैद्यकीय तपासणी करुन घेणे बंधनकारक आहे.

१६) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव चे पत्र क्र. उमवि /९५/७ - अ/५६३० चि. २१/८/ ९५ नुसार महाविद्यालयाच्या आवारात विद्यार्थ्यांस विडी, सिगारेट, तंबाखू , , मादक व गुंगी आणणारे द्रव्ये इ. सेवन करता येणार नाही. एवढेच नव्हे तर खिशातही बाळगता येणार नाही.

१७) प्रवेशाचे नियम व मुदतीत वेळोवेळी केलेले बदल सुचना फलकावर पहावे.

१८) विद्यार्थ्याने सर्व विषयांच्या तासिकांना हजर असणे बंधनकारक आहे. ७५% हजेरी नसल्यास सत्र मान्य होणार नाही व त्यामुळे विद्यापीठ परीक्षेस बसता येणार नाही.

१९) महाविद्यालयाच्या आवारात, वर्गात, ग्रंथालयात व परीक्षा कक्षात भ्रमणध्वनी (Mobile) वापरण्यास सक्त मनाई आहे. ऑनलाईन शिक्षणासाठी प्राध्यापकांच्या परवानगीने भ्रमणध्वनीचा (Mobile) वापर करता येईल.

२०) अनुतीर्ण विद्यार्थ्यांसाठी समुपदेशनाची विशेष सोय उपलब्ध आहे.

२१) प्रथम वर्षाला प्रवेश घेतल्यापासून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठाच्या अध्यादेश ६७ नुसार सहा वर्षाच्या आत विद्यार्थ्यांस पदवी संपादन करणे बंधनकारक राहील.

२२) महाविद्यालयात एकदा प्रवेश निश्चित झाल्यानंतर/घेतल्यानंतर कुठल्याही कारणाने प्रवेश रद्द केल्यास प्रवेश फी परत केली जाणार नाही. कबचौउमवि, जळगाव ने प्रवेश तसेच परीक्षा फीत बदल केल्यास तो बदल लागू राहील.

२३) १२ वी विज्ञान उत्तीर्ण होऊन, D.Ed. अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रथम वर्ष विज्ञान वर्गात व १२ वी कला उत्तीर्ण होऊन, D.Ed. अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रथमवर्ष कला वर्गात प्रवेश घेता येईल.

२४) Polytechnique (Diploma) अभ्यासक्रम उत्तीर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना द्वितीय वर्ष विज्ञान वर्गाच्या ए गृपला थेट प्रवेश मिळेल.

२५) प्रवेशासाठी निवडलेल्या विषयांचे नाव व कोड क्रमांकासाठी विद्यार्थ्यांनी प्रवेश समितीशी संपर्क साधावा.

२६) विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश घेतल्या नंतर गणवेश अत्यावश्यक राहील.

२७) विद्यार्थ्यांनी आपला स्वतःचा प्रवेश अर्ज स्वतः ऑनलाईन भरावयाचा आहे. प्रवेश अर्जावर अचूक भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी द्यावयाचा आहे. भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी बदलता येणार नाही. बदलल्यास होणाऱ्या नुकसानास आपण स्वतः जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

२८) आपणास वेळो वेळी आपण दिलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकवर व ई-मेल वर महाविद्यालयातील उपक्रम, सुचना व परिक्षेविषयी सुचना देण्यात येतील.

२९) विषय निवडतांना प्रवेश समिती सदस्यांशी चर्चा करुनच विषयाची निवड करावी.

## मुलींचे वसतिगृह

महाविद्यालयात ग्रामीण भागातून शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या मुलींसाठी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या तर्फे मिळालेल्या अनुदानातून वसतीगृहाची सुविधा शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून उपलब्ध करण्यात आलेली आहे.

**वसतीगृह प्रवेशासंबंधी नियम व अटी**

- महाविद्यालयात शैक्षणिक वर्षात प्रवेशीत विद्यार्थिनींनाच वसतीगृहात प्रवेश मिळू शकतो.
- वसतीगृह प्रवेश हा पूर्णपणे गुणवत्तेवर आधारीत असेल.
- वसतीगृह प्रवेश अर्ज काळजीपूर्वक भरणे आवश्यक आहे.
- महाविद्यालयीन प्रवेश घेते वेळीच वसतीगृह फि भरणे आवश्यक आहे.
- एस.सी./एस.टी./एन.टी./ओ.बी.सी. / अल्पसंख्यांक विद्यार्थिनीसाठी काही टक्के जागा आरक्षित.
- प्रवेशासंबंधी इतर नियम व अटी महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

## परीक्षेसंबंधी नियम

१) सर्व वर्गांच्या परीक्षा कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नियमानुसार होतील.

२) प्रात्यक्षिक परीक्षा पात्रतेसाठी प्रात्यक्षिक वही (Journals) पूर्ण करुन संबंधित प्राध्यापक व विभाग प्रमुखांकडून वेळेत प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे.

३) महाविद्यालयामध्ये वेळोवेळी होणाऱ्या चाचणी परीक्षा, ट्युटोरीयल, सेमीनार, तोंडी परीक्षा इ. परीक्षांना हजर राहणे आवश्यक आहे. सदर परीक्षांमधील विद्यार्थ्यांच्या प्रगती नुसार अंतर्गत परीक्षेतील गुण दिले जातील.

४) परीक्षा प्रवेश पत्र (Hall Ticket) व महाविद्यालयाचे ओळख पत्र (Identity Card) सोबत असल्याशिवाय विद्यार्थ्याला परीक्षेस बसता येणार नाही.

५) विद्यापीठ नियमानुसार परीक्षा कालावधीत भ्रमणध्वनी (Mobile) वापरण्यास सक्त मनाई आहे.

# शिष्यवृत्ती व आर्थिक सवलती
(S.C./S.T/V.J./N.T./S.B.C./O.B.C)

## ❖ शासकीय शिष्यवृत्ती व आर्थिक सवलती

१) आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी राजर्षि छत्रपती शाहू महाराज शैक्षणिक सवलत :-

A. महाराष्ट्र राज्य सरकारचे एक लाख (१,००,०००/-) रुपयांपेक्षा कमी वार्षिक उत्त्पन्न असणाऱ्या पालकांच्या पाल्यांसाठी ही योजना सुरु केली आहे. सदर सवलतीसाठी Online Form भरणे आवश्यक आहे व त्या भरलेल्या फॉर्मच्या हार्डकॉपी महाविद्यालयात जमा करावे. सवलतीच्या अर्जासाठी विद्याथ्यर्थ्यांनी रु.२,००,०००/- च्या खाली उत्पन्न असल्याचा मा. तहसीलदार यांच्याकडून दाखला आणावा लागतो. उत्पन्न मर्यादा शासन परिपत्रकानुसार असेल.

B. ज्या विद्यार्थ्यांना मागील वर्षी ई.बी.सी. सवलत मिळत होती त्यांनी नुतनीकरणाचे अर्ज Online भरुन उत्पन्नाच्या दाखल्यासह द्यावेत.

२) ज्या विद्यार्थ्यांना चालू वर्षी प्रथमच ई.बी.सी. सवलत घ्यावयाची असेल त्यांनी नवीन अर्ज आणि उत्पन्नाचा दाखला व सवलत घेण्याचे कारण यांचे प्रतिज्ञापत्र दोन प्रतीत द्यावेत.

३) प्राथमिक / माध्यमिक शिक्षकांच्या मुलांसाठी फी ची सवलत (F.E.P.T./S.T.C.) शे. ४५ पेक्षा जास्त गुण प्राप्त करणाऱ्या प्राथमिक शिक्षकांच्या पाल्यांना शासनाच्या अनुदानित अभ्यासक्रमासाठी या योजनेचा फायदा मिळेल.

४) राज्य सरकारी नोकरांच्या पाल्यांना मिळणारी फी सवलत (वार्षिक मुळ उत्पन्न १,००,०००/- रु. पेक्षा कमी)

५) स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलामुलींना शैक्षणिक सवलत शिष्यवृत्ती

६) अपंग विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलत व शिष्यवृत्ती

७) माजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलत

८) मागासवर्गीय विद्यार्थ्यास भारत सरकारची शिष्यवृत्ती - S.C./S.T./VJNT/SBC/OBC इ. विद्यार्थ्यांनी Online शिष्यवृत्तीचे अर्ज भरणे आवश्यक आहे. दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षी प्रवेशित विद्यार्थ्यांनी Online शिष्यवृत्तीचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. Online अर्ज भरणे व नुतनीकरण करणे ही सर्वस्वी विद्यार्थ्यांची जबाबदारी राहील

३०) वरील पैकी कुठल्याही शिष्यवृत्ती व आर्थिक सवलतीसाठी वेळेवर अर्ज सादर न केल्यास व ती न मिळाल्यास त्याबाबतची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील. फी सोबत शिक्षण शुल्कही जमा करावे लागेल.

३१) शिष्यवृत्तीसाठी असलेल्या निकषांची पूर्तता विद्यार्थ्यांकडून होणे अपेक्षित असते असे निकष आणि शिष्यवृत्तीसाठी करावयाच्या अर्जाबाबत सूचना वेळोवेळी फलकावर लावल्या जातात.

३२) शिष्यवृत्तीच्या सूचना वेळोवेळी सूचना फलकावर लावण्यात येतील. त्याकडे विद्यार्थी-विद्यार्थीनींनी त्या वाचणे आवश्यक आहे. वेळेत शिष्यवृत्ती फॉर्म जमा न केल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

३३) शिष्यवृत्तीच्या अधिक माहितीसाठी संबंधीत शिष्यवृत्ती क्लार्कशी चौकशी करावी.

३४) S.C./N.T./S.B.C./O.B.C. उत्पन्न मर्यादा शासन परिपत्रकानुसार असेल.

अल्पसंख्याक शिष्यवृत्ती अर्ज खालील वेब साईटवर भरावे.

www.Mahascholarship.gov.in

मागासवर्गीय एस.सी./एन.टी./एस.बी.सी./ओ.बी.सी. शिष्यवृत्ती/फ्रिशिप

मागासवर्गीय एस.टी. शिष्यवृत्ती / फ्रिशिप अर्ज खालील वेब साईटवर भरावे. Rajarshi Shahu Maharaj open scholarship

वरिल सर्व अर्ज खालील वेब साईटवर भरावे.

https://mahadbt.in **अधिक माहितीसाठी महाविद्यालयाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.**

## ❖ निमशासकीय व खाजगी शिष्यवृती व आर्थिक सवलती

या व्यतिरिक्त महाविद्यालातर्फे निमसरकारी व खाजगी उपक्रम/ संस्था/ आस्थापना यांचेकडील शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना मिळवून देणेसाठी प्रयत्न केला जातो. मागील काही वर्षापासून खालील शिष्यवृत्त्या विद्यार्थ्यांना मिळवून देण्यात आलेल्या आहेत.

| अ क्र | शिष्यवृत्ती नाव | रक्कम (प्रति वर्ष /विद्यार्थी) | समन्वयक |
|---|---|---|---|
| १ | कै. आनंदराव भगवान पाटील, निंबोल –पारितोषिक | १००० प्रति विद्यार्थी | प्रा.डॉ. एस. ए. पाटील, (वनस्पती शास्त्र विभाग) |
| २ | कै. आनंदराव भगवान पाटील, निंबोल – शिष्यवृत्ती | ६००० प्रति विद्यार्थी | |
| ३ | HDFC Bank Parivartan ECSS Scholarship | ३५००० (प्रति वर्ष) | प्रा. प्रदीप तायडे, (इतिहास विभाग) |
| ४ | LIC of India गोल्डन जुबली योजना | २०००० (प्रति वर्ष) | |
| ५ | SD-SEED योजना | ३००० (प्रति वर्ष) | |
| ६ | HPCL Unnati शिष्यवृत्ती | ९००० (प्रति वर्ष) | प्रा. एस. एस. साळुंके , (ग्रंथपाल) |

# कला शाखा ( Arts Faculty ) पदवी स्तर (UG)

## F.Y.B.A.

**Faculty : Humanities**

| YEAR | SEM-I | MAJOR/MINOR (CORE) SUBJECT | | | GE/OE | AEC, VEC, IKS | | | CC |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | SELECT ANY ONE GROUP | M1 DSC-1 (4) | M2 DSC-2 (4) SELECT ANY ONE | M3 DSC-3 (4) SELECT ANY ONE | OE-1 (2) SELECT ANY ONE | AEC-1 (2) | VEC-1 (2) | IKS (2) | CC-1 (2) SELECT ANY ONE |
| 1 (4.5) | Group-I | MARATHI | 1. HINDI 2. ENGLISH | 1. POLITICS 2. PSYCHOLOGY 3. GEOGRAPHY 4. HIS of CIVIL | 1. PLANT NURSERY MANAGEMENT 2. VERMITECHNIQUES 3. CHEMISTRY IN EVERYDAY LIFE 4. MATHEMATICS FOR COMPETITIVE EXAMINATIONS 5. MATERIALS IN TODAYS WORLD | **AEC-1:** ENGLISH FOR ALL : ORAL COMMUNICATION **VEC-1:** ENVIRONMENT STUDIES **IKS :** INDIAN KNOWLEDGE SYSTEM | | | 1. NSS-1 2. SPORTS-1 3. CILTUREAL-1 4. STUDENT WELFARE ACTIVITY-1 5. YOGA |
| | Group-II | ECONOMICS | 1. POLITICS 2. PSYCHOLOGY 3. GEOGRAPHY 4. HIS of CIVIL | 1. HINDI 2. ENGLISH | | | | | |
| | Group-III | HISTORY | | | | | | | |
| | CREDITS | 04 | 04 | 04 | 02 | 02 | 02 | 02 | 02 |

| YEAR | SEM-II | MAJOR/MINOR (CORE) SUBJECT | | | GE/OE | AEC, VEC, IKS | | | CC |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | SELECT ANY ONE GROUP | M1 DSC-4 (4) | M2 DSC-5 (4) | M3 DSC-6 (4) | OE-2 (4) SELECT ANY ONE | AEC-2 (2) | VEC-2 (2) | IKS (0) | CC-2 (2) SELECT ANY ONE |
| 1 (4.5) | | SELECTED GROUP AS ABOVE IN SEM-1 | | | 1. FOOD TECHNOLOGY 2. PUBLIC HEALTH AND HYGIENE 3. FOOD CHEMISTRY 4. QUANTITATIVE APTITUDE AND LOGICAL REASONING 5. ENERGY | **AEC-2:** ENGLISH FOR ALL : WRITTEN COMMUNICATION **VEC-2:** CONSTITUTION OF INDIA | | | 1. NSS-2 2. SPORTS-2 3. CILTUREAL-2 4. STUDENT WELFARE ACTIVITY-1 5. HUMAN RIGHTS AND ENV.LAWS |
| | CREDITS | 04 | 04 | 04 | 04 | 02 | 02 | 00 | 02 |
| TOTAL CEEDIT : 44 | | 08 | 08 | 08 | 06 | 04 | 04 | 02 | 04 |

## S.Y.B.A.

**Faculty : Humanities**

| SEM | SUBJECT-I (M-1) MAJOR *Choose Previous Year M-1 As A Mandatory Subject.* | | SUBJECT-II (M-2) MINOR *Choose Any One From Previous Year M2 And M3.* | OE *Same As Previous Year* | VC, SEC *Paper Base On Mandatory Subject* | AEC,VEC, IKS | CC, INT/OJT/PW |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | Mandatory DSC | Elective DSE | | | | | |
| SEM-III | DSC-7 (2) DSC-8 T/P (4) DSC-9 (2) IKS | --- | MIN-1 (2) | OE-3 (2) | VSC-1 (2) SEC-1 (4) | AEC-3 (2) (MIL) | CC-3 (2) |
| | • HISTORY • ECONOMICS • MARATHI | | • POLITICS • PSYCHOLOGY • GEOGRAPHY • HINDI • ENGLISH | • ZOOLOGY • BOTANY | VOCATIONAL AND SKILL PAPER OF MAJOR SUBJECT | MODERN INDIAN LANGUAGE • Marathi • English | • NCC -3 • NSS-3 • SPORTS -3 • CULTURAL -3 • STUDENT WELFARE ACTIVITY-3 • CYBER SECURITY |
| CREDITS | 8 | | 2 | 2 | 6 | 2 | 2 |
| SEM-IV | DSC-10 (2) DSC-11 T/P (4) | --- | MIN-2 (2) | OE-4 (2) | VSC-2 (2) SEC-2 (2) | AEC-4 (2) (MIL) | CC-4 (2) INT/OJT/PW(4) |
| | THE FOURTH SEMESTER WILL BE THE SAME AS THE THIRD SEMESTER. | | | ZOOLOGY BOTANY | VOCATIONAL AND SKILL PAPER OF MAJOR SUBJECT | *Same as the third semester* | • NCC-4 • NSS-4 • SPORTS-4 • CULTURAL-4 • STUDENT WELFARE ACTIVITY-4 • COMMUNICATION SKILLS AND PERSONALITY DEVELOPMENT • INT/OJT/PW(4) |
| CREDITS | 6 | | 2 | 2 | 6 | 2 | 6 |
| TOTAL CREDITS | 14 | | 4 | 4 | 10 | 4 | 8 |

**सत्र -४ ची विद्यापीठाची परीक्षा संपल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याला OJT (On-the-Job Training) पूर्ण करणे बंधनकारक आहे.**

# T.Y.B.A.

**Faculty : Humanities**

| SEM | MAJOR CORE SUBJECT<br>*Choose Previous Year Mandatory Subject As A Mandatory Subject For TY* | | MINOR SUBJECT<br>*Choose Previous Year Minor Subject As A Minor Subject For TY* | OE | VC, SEC<br>*Paper Base On Mandatory Subject* | AEC,VEC, IKS | CC, INT/OJT/PW |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | Mandatory (DSC) | Elective (DSE) | | | | | |
| SEM-V | DSC-12 (2)<br>DSC-13 (4)<br>DSC-14 Th/Pr (4) | DSE-1 OR 2(4) | MIN-3(4) | -- | VSC-3(2) | -- | FP (2) |
| | • HISTORY<br>• ECONOMICS<br>• MARATHI | *Paper Base On Mandatory Subject* | • POLITICS<br>• PSYCHOLOGY<br>• GEOGRAPHY<br>• HINDI<br>• ENGLISH | -- | *Paper Base On Mandatory Subject* | -- | *Paper Base On Mandatory Subject* |
| CREDITS | 10 | 4 | 4 | 0 | 2 | 0 | 2 |
| SEM-VI | DSC-15 (2)<br>DSC-16 (4) DSC-17 Th/Pr(4) | DSE-3 OR 4 (4) | MIN-4(2) | -- | VSC-4(4) | -- | FP (2) |
| | THE SIXTH SEMESTER WILL BE THE SAME AS THE FIFTH SEMESTER. | | | | | | |
| CREDITS | 10 | 4 | 2 | 0 | 4 | 0 | 2 |
| TOTAL CREDITS | 20 | 8 | 6 | 0 | 6 | 0 | 4 |

## Abbreviations:

| | |
|---|---|
| T: Theory Course | VEC: Value Education Courses |
| P: Practical course | IKS: Indian Knowledge System |
| DSC: Discipline Specific Core Course | CC: Co-curricular course |
| DSE: Discipline Specific Elective Course | CEP: Community engagement and service |
| MIN: Minor subject | OJT: On Job Training: Internship/Apprenticeship |
| VSEC: Vocational skill and Skill enhancement courses | RP: Research Project |
| VC: Vocational Skill Courses | RM: Research methodology |
| SEC: Skill Enhancement Courses | EA: Environment Awareness |
| GE/OE: Generic/Open elective | ENG: English |
| CI: Constitution of India | MIL: Modern Indian language |
| AEC: Ability Enhancement Courses | |

## Observations:

**Major DSC (Mandatory):** is the subject that represents the main focus of the degree, and the degree will be awarded in that Subject. Students should secure a minimum 50% of total credits through Major (core) Courses (mandatory courses, electives, vocational courses, Internship/Field Projects/ Apprenticeship/Community Engagement Projects, Seminars, and Group Discussion. In addition, Entrepreneurship, IPR and Research Project shall be offered in case of Honors with Research Degree) in Three /Four Years for the award of Major Degree.
**Major Specific IKS** (Cr-2) is included under Major.
**Minor:** is the subject that may complement the Major subject or can have interdisciplinary bandwidth. Minor subject may be related or unrelated to the Major subject. The Minor subjects may be from the different disciplines of the same faculty of DSC Major (Core) or they can be from different faculty altogether.
**GE/OE:** is to be chosen compulsorily from faculty other than that of the Major and from the faculty-wise baskets of OE prepared by University/Colleges.
**SEC (Skill Enhancement Courses)** to be selected from the basket of Skill Courses approved by the University.
**VC (Vocational Skill Courses):** including Hands on Training corresponding to the Major and/or Minor Subject, to be selected from the basket. Wherever applicable vocational courses will include skills based on advanced laboratory practical of Major.
**AEC (Ability Enhancement Courses):** a) English: 04Credits, b) Modern Indian Language (MIL):04 credits,
**VEC (Value Education Courses):** to be chosen from the courses, such as; Understanding India, Environmental Science/Education, and Digital and Technological Solutions,
**IKS (Indian Knowledge System):** Courses on IKS to be selected from the basket of IKS courses approved by the University.
**CC: (Co-curricular Courses):** to be chosen from the courses, such as: Health and Wellness, Sports and Yoga, Environmental Awareness, Constitution of India, Cyber Security, Human Rights and Environment Law, Communication Skills and Personality Development, Cultural Activities, NSS/NCC and Fine/Applied/ Visual/ Performing Arts. (Activities/Theory/Practical/Assignment).
**FP/CEP:** Field Projects/Community Engagement and Service corresponding to the Major (Core) Subject.

# विज्ञान शाखा ( Science Faculty ) पदवी स्तर (UG)

## F.Y.B.Sc

**Faculty : Sciecne & Technology**

| Year (Level) | Sem. | | Subject-I (M-1) | Subject-II (M-2) | Subject-III (M-3) | Open Elective (OE) | AEC, VEC, IKS | | | CC, FP, CEP, OJT, RP |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Sem-I | | DSC-1 (2T)<br>DSC-2 (2P) | DSC-1 (2T)<br>DSC-2 (2P) | DSC-1 (2T)<br>DSC-2 (2P) | OE-1(2T)<br>SELECT ANY ONE | AEC-1 (2) | VEC-1 (2) | IKS (2) | CC-1 (2)<br>SELECT ANY ONE |
| 1 (4.5) | SELECT ANY ONE GROUP | Group-1 | Chemistry | Physics | Maths | A. History of Khandesh -1<br>B. Fundamentals of Banking-I<br>C. Psychology of Happiness<br>D. Indian Polity -1<br>E. Agriculture Geography<br>F. Studies in English Literature and Language – 1<br>G. Library and Information System<br>H. हिंदी - लेखनकौशल्य<br>I. स्पर्धा परीक्षांसाठी मराठी व्याकरण भाग-१ | AEC-1:<br>ENGLISH FOR ALL : ORALCOMMUNICATION<br>VEC-1:<br>ENVIRONMENT STUDIES<br>IKS :<br>INDIAN KNOWLEDGE SYSTEM (GENERIC) | | | A. NCC-1<br>B. NSS - 1<br>C. Sports - 1<br>D. Cultural Activities-1<br>E. IPDC – 1<br>F. Student Welfare Activities– 1<br>G. Yoga |
| | | Group-2 | Chemistry | Botany | Zoology | | | | | |
| | | Group-3 | Computer Science | Physics | Maths | | | | | |
| | CREDITS | | 04 | 04 | 04 | 02 | 02 | 02 | 02 | 02 |
| | Sem-II | | DSC-3 (2T)<br>DSC-4 (2P) | DSC-3 (2T)<br>DSC-4 (2P) | DSC-3 (2T)<br>DSC-4 (2P) | OE-2(4T) | AEC-2 (2) | VEC-2 (2) | IKS (0) | CC-2 (2) |
| 1 (4.5) | | | The Selected Group Will Be The Same As Semester 1. | | | Same As Semester 1. | AEC-2:<br>ENGLISH FOR ALL : WRITTEN COMMUNICATION<br>VEC-2:<br>CONSTITUTION OF INDIA | | | Same As Semester 1. |
| | CREDITS | | 04 | 04 | 04 | 04 | 02 | 02 | 00 | 02 |
| TOTAL CEEDIT : 44 | | | 08 | 08 | 08 | 06 | 04 | 04 | 02 | 04 |

## S.Y.B.Sc

**Faculty : Sciecne & Technology**

| SEM | SUBJECT-I (M-1) MAJOR<br>*Student must choose one subject as a Major subject out of M-1, M-2, M-3 that He/She has chosen at First Year.* | | SUBJECT-II (M-2) MINOR<br>*Student must choose one subject as a Major subject out of M-1, M-2, M-3 that He/She has chosen at First Year.* | OE<br>*Same As Previous Year* | VC, SEC<br>*Paper Base On Mandatory Subject* | AEC,VEC, IKS | CC, INT/OJT/PW |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | Mandatory DSC | Elective DSE | | | | | |
| SEM-III | DSC-5 (2T)<br>DSC -6 (2T) (IKS)<br>DSC -7 (2P) | --- | MIN-1 (2T)<br>MIN-2 (2T)<br>MIN-3 (2P) | OE-3 (2T) | SEC-1 (2T)<br>SEC-2 (2P) | AEC-3 (2) (MIL) | CC-3 (2) |
| | Chemistry | --- | Physics / Maths | *Same As Previous Year* | SKILL PAPER OF MAJOR SUBJECT | MODERN INDIAN LANGUAGE<br>• Marathi<br>• English | • NCC-3<br>• NSS-3<br>• SPORTS-3<br>• CULTURAL-3<br>• STUDENT WELFARE ACTIVITY-3<br>• CYBER SECURITY |
| | | --- | Botany / Zoology | | | | |
| | Computer Science | --- | Physics / Maths | | | | |
| CREDITS | 06 | --- | 06 | 02 | 04 | 02 | 02 |
| SEM-IV | DSC -8 (2T)<br>DSC -9 (2P) | --- | MIN-4 (2T)<br>MIN-5 (2P) | OE-4 (2T) | VC-1 (2T)<br>VC-2 (2P) | AEC-4 (2) (MIL) | CC-4 (2) &<br>OJT / Int/CEP (4) |
| | THE FOURTH SEMESTER WILL BE THE SAME AS THE THIRD SEMESTER. | | | *Same As Previous Year* | VOCATIONAL PAPER OF MAJOR SUBJECT | *Same as the third semester* | • NCC-4<br>• NSS-4<br>• SPORTS-4<br>• CULTURAL-4<br>• STUDENT WELFARE ACTIVITY-4<br>• COMMUNICATION SKILLS AND PERSONALITY DEVELOPMENT<br>• INT/OJT/PW(4) |
| CREDITS | 04 | | 04 | 02 | 04 | 02 | 06 |
| TOTAL CREDITS | 10 | | 10 | 04 | 08 | 04 | 08 |

After completion of the Sem-IV university examination, every II year students must complete OJT

# T.Y.B.Sc

**Faculty : Sciecne & Technology**

| SEM | MAJOR CORE SUBJECT<br>*Choose Previous Year Mandatory Subject As A Mandatory Subject For TY* | | MINOR SUBJECT | OE | VC, SEC<br>*Paper Base On Mandatory Subject* | AEC,VEC, IKS | CC, INT/OJT/PW |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | Mandatory (DSC) | Elective (DSE) | | | | | |
| SEM-V | DSC -10 (2T)<br>DSC -11 (2T)<br>DSC -12 (2T)<br>DSC -13 (2T)<br>DSC -14 (2T)<br>DSC -15 (2P)<br>DSC -16 (2P) | DSE-1 (2T)<br>DSE-2 (2P) | ----- | ----- | SEC-3 (2T) | ----- | FP-1 (2) |
| | • CHEMISTRY<br>• COMPUTER SCIENCE | *Paper Base On Mandatory Subject* | ----- | ----- | *Paper Base On Mandatory Subject* | ----- | *Paper Base On Mandatory Subject* |
| CREDITS | 14 | 04 | 00 | 00 | 02 | 00 | 02 |
| SEM-VI | DSC -17 (2T)<br>DSC -18 (2T)<br>DSC -19 (2T)<br>DSC -20 (2T)<br>DSC -21 (2P)<br>DSC -22 (2P) | DSE-3 (2T)<br>DSE-4 (2P | ----- | ----- | VC-3 (2T)<br>VC-4 (2P) | ----- | FP-2 (2) |
| | THE SIXTH SEMESTER WILL BE THE SAME AS THE FIFTH SEMESTER. | | | | | | |
| CREDITS | 12 | 04 | 00 | 00 | 04 | 0 | 02 |
| TOTAL CREDITS | 26 | 08 | 00 | 00 | 06 | 0 | 04 |

## कला शाखा ( Arts Faculty ) पदव्युत्तर स्तर (PG)

| अभ्यासक्रम | कालावधी | प्रवेश पात्रता |
|---|---|---|
| एम. ए. – मराठी | नियमित दोन वर्ष | पदवीधर |
| एम. ए. - अर्थशास्त्र | नियमित दोन वर्ष | पदवीधर |

After completion of the Sem-IV university examination, every II year students must complete OJT

## विज्ञान शाखा ( Science Faculty ) पदव्युत्तर स्तर (PG)

| अभ्यासक्रम | कालावधी | प्रवेश पात्रता |
|---|---|---|
| M. Sc. (Organic Chemistry) | नियमित दोन वर्ष | B.Sc. Chemistry |

After completion of the Sem-IV university examination, every II year students must complete OJT

# प्रवेश शुल्क ( Admission Fees ) 2026-27

## Graduate Course

**Sardar Vallabhbhai Patel Arts & Science College, Ainpur, Tal-Raver, Dist-Jalgaon**
**Granted Paying/Scholarship and Non-Grant Fee Structure- 2026-27**
**As per K.B.C. North Maharashtra University Circular No. 30/2022 dated 17/06/2022**

| Sr. No. | Particular | B.Sc. | | | B.A | | | B.Sc. Computer Science | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | F.Y. | S.Y. | T.Y. | F.Y. | S.Y. | T.Y. | F.Y. | S.Y. | T.Y. |
| 1 | Tuition Fee | 800 | 800 | 800 | 800 | 800 | 800 | 800 | 800 | 800 |
| 2 | Gymkhana Fee | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 |
| 3 | Magazine Fee | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 |
| 4 | Library Fee | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 |
| 5 | Tutorial & Internal Exam Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 6 | Laboratory Fee | 1000 | 1100 | 1200 | 0 | 0 | 0 | 1000 | 1100 | 1200 |
| 7 | Admission Fee | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 8 | Gathering Fee | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 |
| 9 | NMU Computerization Fee | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 10 | Eligibility Fee | 100 | 0 | 0 | 100 | 0 | 0 | 100 | 0 | 0 |
| 11 | College Development Fee | 80 | 80 | 80 | 80 | 80 | 80 | 80 | 80 | 80 |
| 12 | Disaster Management fee | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 13 | G. K. Fee | 0 | 100 | 0 | 0 | 100 | 0 | 0 | 100 | 0 |
| 14 | e-Suvidha | 118 | 118 | 118 | 118 | 118 | 118 | 118 | 118 | 118 |
| 15 | Student Activities | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 |
| 16 | Environment Studies Fee | 150 | 0 | 0 | 150 | 0 | 0 | 150 | 0 | 0 |
| 17 | Medical Fee | 40 | 0 | 0 | 40 | 0 | 40 | 40 | 0 | 40 |
| 18 | Student Group Insurance | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 |
| 19 | Poor Student Aid Fund | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 |
| 20 | Krida Mahotsav | 36 | 36 | 36 | 36 | 36 | 36 | 36 | 36 | 36 |
| 21 | Alumni Association Fee | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 |
| 22 | Personality Devp. & Carrier Fee | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 23 | KBCNMU NSS | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 24 | Internet & Generator Facility Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 25 | Common Breakage | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 26 | Miscellaneous Fee | 100 | 100 | 100 | 150 | 150 | 150 | 100 | 100 | 100 |
| 27 | Student App & Soft. Fee | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 28 | Admission Form Fee | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 29 | Yuvarang Fee | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 30 | Training & Placement | 20 | 20 | 50 | 20 | 20 | 50 | 20 | 20 | 50 |
| 31 | Flag Fund | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 32 | Green Energy Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 33 | Library Deposit | 150 | 0 | 0 | 150 | 0 | 0 | 150 | 0 | 0 |
| 34 | Laboratory Deposit | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | **Additional Non Grant basis fee structure for Computer Science** | | | | | | | | | |
| 35 | **Tuition Fee (Non Grant)** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 5200 | 5200 | 5200 |
| 36 | **Laboratory Fee (Non Grant)** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 4000 | 3900 | 3800 |
| | **Total** | **3804** | **3564** | **3594** | **2854** | **2514** | **2484** | **13004** | **12664** | **12634** |
| 37 | **UA Exam Fee** | 1480 | 1890 | 2010 | 810 | 1110 | 1330 | 1480 | 1890 | 2010 |
| 38 | **UA Degree Certificate Fee** | 0 | 0 | 550 | | | 550 | 0 | 0 | 550 |
| | Net Total | **5284** | **5454** | **6154** | **3664** | **3624** | **4364** | **14484** | **14554** | **15194** |

**Sardar Vallabhbhai Patel Arts & Science College, Ainpur, Tal-Raver, Dist-Jalgaon**

## Paying, Scholarship and Non-Grant Fee Structure- 2026-2027

**As per K.B.C. North Maharashtra University Circular No. 30/2022 dated 17/06/2022**

# Post-Graduate Course

| Sr. No. | Particular | M.Sc-I Organic Chemistry | M.Sc-II Organic Chemistry | M.A.-I | M.A.-II |
|---|---|---|---|---|---|
| | | I Year | II Year | I Year | II Year |
| 1 | Tuition Fee | 15000 | 15000 | 5000 | 5000 |
| 2 | Gymkhana Fee | 150 | 150 | 150 | 150 |
| 3 | Magazine Fee | 60 | 60 | 60 | 60 |
| 4 | Library Fee | 300 | 300 | 300 | 300 |
| 5 | Tutorial & Internal Exam Fee | 100 | 100 | 100 | 100 |
| 6 | Laboratory Fee | 8000 | 8000 | 0 | 0 |
| 7 | Admission Fee | 50 | 50 | 50 | 50 |
| 8 | Gathering Fee | 60 | 60 | 60 | 60 |
| 9 | KBCNMU Computerization Fee | 20 | 20 | 20 | 20 |
| 10 | Eligibility Fee . | 100 | 0 | 100 | 0 |
| 11 | College Development Fund | 100 | 100 | 100 | 100 |
| 12 | Disaster Management fee | 10 | 10 | 10 | 10 |
| 13 | e-Suvidha | 118 | 118 | 118 | 118 |
| 14 | Student Activities | 75 | 75 | 75 | 50 |
| 15 | Medical Fee | 50 | 50 | 50 | 50 |
| 16 | Student Group Insurance | 40 | 40 | 40 | 40 |
| 17 | Poor Student Aid Fee | 100 | 100 | 100 | 100 |
| 18 | Krida Mahotsav | 36 | 36 | 36 | 36 |
| 19 | Alumni Asso. Fee | 50 | 50 | 50 | 50 |
| 20 | Personality Devp. & Carrier Fee | 50 | 50 | 50 | 50 |
| 21 | NSS KBCNMU | 10 | 10 | 10 | 10 |
| 22 | Registration Fee | 100 | 0 | 100 | 0 |
| 23 | Internet & Generator Facility Fee | 100 | 100 | 100 | 100 |
| 24 | Common breakage | 200 | 200 | 50 | 50 |
| 25 | Miscellaneous Fee | 150 | 150 | 150 | 150 |
| 26 | Student App & Soft Fee | 50 | 50 | 50 | 50 |
| 27 | Admission Form Fee | 10 | 10 | 10 | 10 |
| 28 | Yuvarang Fee | 50 | 50 | 50 | 50 |
| 29 | Training & Placement | 100 | 100 | 100 | 100 |
| 30 | Flag Fund | 10 | 10 | 10 | 10 |
| 31 | Green Energy Fee | 200 | 200 | 200 | 200 |
| 32 | Library Deposit | 150 | 0 | 150 | 0 |
| | **Total** | **25599** | **25249** | **7449** | **7074** |
| 33 | UA Exam Fee | **2300** | **2990** | **1220** | **1480** |
| 34 | UA Degree Certificate Fee | 0 | 550 | 0 | 550 |
| | **Net Total** | **27899** | **28789** | **8669** | **9104** |

# विद्यार्थ्यासाठी विविध योजना

**१. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका ही योजना**

कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका ही योजना पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या या विद्यार्थ्यांसाठी आहे. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल चटक, होतकरू व गरजू विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासार्टी ही योजना आहे. या योजनेचा उद्देश स्वावलंबनाने विद्यार्थ्याला श्रमाची आवड निर्माण करणे, श्रमाची प्रतिष्ठा वाढविणे स्वयंरोजगारासावी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे आदि मुख्य उद्देश योजनेचे आहेत. योजनेत विद्यार्थ्यान अध्ययनाच्या वेळेव्यतिरीक्त किमान तीन तास काम करणे अपेक्षीत आहे. या योजनेव्दारे विद्यार्थ्यांना आर्थिक लाभ मिळतो.

**२. साहस कार्यशाळा**

विद्यार्थ्यांना साहसीवृत्ती निर्माण होणेविषयी या कार्यशाळेत प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले जाते. संकटांना धैर्याने सामोरे जाणे, मार्ग काढणे, मदत करणे, गिर्यारोहण, रोप वे, पुल बांधणी, रस्ता दुरुस्ती, दिशा ओळख, आकाश निरीक्षण, आत्मसंरक्षण व प्रतिकार आणि निसर्ग सहल असे विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. प्रत्येक कि महाविद्यालयातील १ विद्यार्थी व १ विद्यार्थीनी या कार्यशाळेत सहभागी वि होऊ शकतात.

**३. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह विद्यार्थी सहायता योजना**

विद्यापीवाच्या शैक्षणिक प्रशाळा अथवा विभागांमध्ये पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नियमित प्रवेशित व विद्यापीठाच्या वसतिगृहात निवासित विद्यार्थ्यांपैकी जे आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या होतकरु विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह विद्यार्थी सहाय्यता योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

**४. उमवि संचलित चाणक्य स्पर्धा परीक्षा :**

विद्यार्थ्यांमधील स्पर्धा परीक्षा कौशल्य वृद्धिंगत करणेसाठी व पूर्वतयारीसाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विद्यापीव स्तरावर चाणक्य स्पर्धा परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येते. प्रत्येक महाविद्यालय हे परीक्षा केंद्र आहे. ५० पेक्षा जास्त परीक्षार्थी असलेल्या महाविद्यालयांना पूर्वतयारीसाठी स्पर्धा परीक्षा पुस्तकासाठी अनुदान देण्यात येते. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रक देण्यात येतील, स्थानिक महाविद्यालयातील विद्यार्थी कल्याण अधिकारी हे या उपक्रमाचे प्रमुख असतील. तलाठी, पी.एस.आय., तहसीलदार या पदांसाठीच्या स्पर्धा परीक्षेची तयारी या उपक्रमाव्दारे होईल. सदर परीक्षेतमहाविद्यालयातील कितीही विद्यार्थी सहभागी होवू शकतात.

**५. उमवि विद्यार्थी दत्तक योजना :**

विद्यापीठ विभागातील विविध प्रशाळा व शैक्षणिक विभाग यातील शिक्षण घेणाऱ्या गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०११-२०१२ पासून उमवि विद्यार्थी दत्तक योजना सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी १० विद्यार्थी व १० विद्यार्थीनी यांना योजनेचा लाभ देण्यात येतो.

**६. विद्यार्थी संशोधन योजना :**

संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी, संशोधक विद्यार्थी आर्थिक अडचणीमुळे मागे राहू नये या साठी संशोधक विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाव्दारे भरीव आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठाचे विभाग व संलग्नीत महाविद्यालये यांचेसाठी संशोधन विकास योजना आहे. विद्यार्थी कल्याण विभाग अंतर्गत विद्यार्थी संशोधन प्रोत्साहन योजना मा. कुलगुरु प्रायोजित विशेष संशोधन योजना विज्ञान व तंत्रज्ञान विषयात विशेष कार्य

करणाऱ्या विद्यार्थ्यांस जी. एच. रायसोनी यांचे सौजन्याने तीन संशोधक विद्यार्थ्यांना रु. ७०००/- ते १००००/- पर्यंत प्रतिमाह संशोधन शिष्यवृत्ती दिली जाते.

**७. सांस्कृतिक गुण कार्यशाळा आयोजन :**

विद्यार्थ्यांना गायन, वादन, नृत्य, नाट्य, सुत्र संचलन कार्यशाळा या क्षेत्रातील नव्या संकल्पना, तंत्रज्ञान अवगत व्हावे त्यांची सांस्कृतिक क्षेत्रातील प्रगती व्हावी यासाठी कार्यशाळांचे आयोजन विद्यापीठ स्तरावर विद्यार्थी कल्याण विभाग करते.

**८. युवती सभा कार्यशाळा :**

विद्यार्थी विकास विभागामार्फत नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनीकरीता महाविद्यालयीन स्तरावर विशेष स्वरुपाच्या उपक्रमांचे आयोजन करणेकरीता युवती सभा अंतर्गत स्वयंसिद्धा - अभियान व विद्यार्थीनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा आयोजित करण्यात येते. प्रत्येक कार्यशाळेत महाविद्यालयातील ५० विद्यार्थीनी सहभागी होवू शकतात.

**९. एकलव्य विद्याधन कर्ज योजना :**

एकलव्य विद्याधन कर्ज योजना ही पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आहे. योजनेत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी येणाऱ्या खर्चाच्या ७० टक्के रक्कम कर्ज स्वरुपात आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुर्ततेनंतर बँकेव्दारे उपलब्ध होते. शिक्षण कर्जासाठी व्याजाचा दर द.सा.द.शे. ११ टक्के असेल. शिक्षण कालावधीमधील खर्चाच्या व्याजाची रक्कम विद्यापीठ कार्यालयाव्दारे अदा केली जाते. ज्या विद्यार्थ्यास प्रवेशित काळात शासकिय / निमशासकिय /सहकारी संस्था/बँका यांच्याकडून कोणतेही विद्यावेतन/शिष्यवृत्ती मिळत नसेल, असाच विद्यार्थी या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र राहील.

**१० मा. कुलगुरु वैद्यकिय निधी योजना :**

विद्यार्थी सामुहिक सुरक्षा योजनेशिवाय अपघाती / नैसर्गिक मृत्यू झाल्यास रु. ५०००/- मृत विद्यार्थ्याच्या पालकास मा. कुलगुरु वैद्यकिय निधीतून देण्यात येतील. प्रवेशीत विद्यार्थ्यास एखादा गंभीर आजार, अपघाताने जखमी झाल्यास उपचारासाठी योग्य त्या कागदपत्रांची खातरजमा करून आर्थिक सहाय्य करण्यात येते.

**११ बहिणाबाई अभ्यासिका :**

क.ब.चौ.उ.म.विद्यापिठ जळगांव, विद्यार्थी विकास विभाग यांच्याकडून महाविद्यालयास सन २०२३-२४ पासून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी करता यावी. यासाठी स्वतंत्र्य अभ्यासिका चालविण्यासाठी प्रोत्साहनपर अनुदानासह मंजुरी मिळाली. याचा फायदा स्पर्धापरीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना होत आहे.

**टीप :** विद्यापीठ निधी आणि मा. कुलगुरू निधीतून राबविल्याजाणार्या विद्यार्थी विकास योजनांची माहिती विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर मराठी आणि इंग्रजी भाषेत उपलब्ध आहे.
महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास अधिकारी - प्रा. एच. एम. बाविस्कर यांचेशी मो. न. ९४२३९०४२२४ या क्रमांकावर योजनांच्या माहितीसाठी संपर्क साधावा.



महाराष्ट्र राज्य
उच्च व तंत्र शिक्षण विभाग व
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र
यांच्या संयुक्त विद्यमाने
SBI
PMKVY
DDU-GKY
उद्योजक आपल्या भेटीला
➢ उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास
➢ व्यवस्थापकीय कौशल्य व प्रत्यक्ष उद्योजकांचे मार्गदर्शन
➢ वित्त व्यवस्थापन
➢ निर्णय क्षमता
➢ जोखीम व्यवस्थापन (Risk Management)
➢ मनुष्यबळ व साधनसामुग्री व्यवस्थापन
➢ आधुनिक तंत्रज्ञान
करिअर कट्टा
युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी
आयएएस आपल्या भेटीला
➢ राज्यपातळीवरील स्पर्धा परीक्षा महाराष्ट्र लोकसेवा आयोग
➢ पोलीस भरती
➢ बँकिंग सेवा
➢ स्टाफ सिलेक्शन कमिशन
➢ केंद्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षा (यु.पी.एस.सी.)
IAS
IPS
IAAS
ICAS
IFS
IDAS
ICLS
IDES
EQ CLUB
Club
BUSINESS CLUB
३६५ रुपयांमध्ये
१००० दिवस
मार्गदर्शन
५० add on
कोर्सेस मोफत
५२
संवाद शृंखला
मधुर समन्वय
ध्येयाच्या वाटेवर
सातत्याने ३६५ दिवस
नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी
७५०७६५२५५५ या नंबरवर आपले नाव करा
Web. : www.mitsc.co.in

## Draft to include in Prospectus
### Career Katta
**(Career and Entrepreneurship Counseling, Skill Development, Internships, Placement, etc.)**

Career Katta is an initiative of Department of Higher and Technical Education, Govt of Maharashtra and in coordination with Maharashtra Information Technology Support Centre. The college conducts various activities to guide students about Career, Competitive Examinations (UPSC, MPSC, Banking, SSB, SSC, Police, LIC, etc.), Entrepreneurship, Skill Development; Credit Earnings under new CBCS and NEP Curriculum Framework, Internship and Placement Opportunities, etc.

**Eligibility to Join:**

Any student admitted for any regular course in the college or college alumni referred by College Coordinator.

**Registration Fees:**

A one-time fee of Rs. 365 for 1000 days provides free access to all activities, courses, and State-Level Competitive Examinations, etc.

**College Code:** C- 8956 (Please include the AISHE code of the College)

Website : www.ainpurcollege.ac.in

**Contact:** For more details visit college webpage .................. or contact Coordinator ....................

Prof. Dr. S. N. Vaishnav, Mob. No. 9975675010

........................................ or Career Katta Helpline 75076 52555

## करिअर कट्टा अंतर्गत

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये अपेक्षित असणारे पदवीच्या प्रथम वर्षासाठी सर्व विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणारे कोर्सेस

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | VEC | Indian constitution | 2 Credits |
| | | Environmental studies | |
| 2 | AEC | German Language | 2 Credits |
| | | Russian Language | |
| | | Arabic Language | |
| | | Spanish Language | |
| | | French Language | |
| | | Japanese Language | |
| 3 | VSC | Communication skill development | 2 Credits |
| | | Writing skill in English | |
| | | Business communication | |
| | | Personality development | |
| | | Writing skill in Marathi | |

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | IKS | Generic Indian knowledge system | 2 Credits |
| 5 | CC | NSS | 2 Credits |
| | | Cultural | |
| | | Sports | |
| | | NCC | |
| 6 | GE/OE | Digital marketing | 2 Credits |
| 7 | GE/OE | Event management | 2 Credits |
| 8 | GE/OE | Basic concepts of accounting | 2 Credits |
| 9 | GE/OE | Emotional intelligence | 2 Credits |
| 10 | GE/OE | Time and stress management | 2 Credits |
| 11 | GE/OE | Financial literacy | 2 Credits |
| 12 | GE/OE | Personality development for overseas placement | 2 Credits |

# :: प्रवेश सूचना ::

## शैक्षणिक वर्ष २०२६ - २७

### प्रथम वर्ष विज्ञान व प्रथम वर्ष कला वर्गात प्रवेश घेते वेळी आवश्यक कागदपत्रे

- SSC BOARD CERTIFICATE २ सत्यप्रत
- HSC MARKSHEET -३ सत्यप्रत (ORIGINAL MÄRKSHEET)
- LEAVING CERTIFICATE ३ सत्यप्रत (ORIGINAL LEAVING CERTIFICATE)
- आधार कार्ड (अपडेट असलेले) २ सत्यप्रत
- अलीकडील कलर पासपोर्ट साईज फोटो - २
- जातीचा दाखला २ सत्यप्रत
- डोमिसाईल प्रमाणपत्र २. सत्याप्रत
- मतदान नोंदणी झाली असल्यास त्याची प्रत लावावी अथवा आई किंवा वडिलांचे मतदान कार्डची सत्यप्रत
- रेशन कार्ड
- शैक्षणिक गॅप असल्यास १०० रु. च्या स्टॅम्प पेपर वरती गॅप सर्टिफिकेट आवश्यक.
- OBC / VJ-NT / SBC / विद्यार्थ्यांनी ३१-०३-२०२७ या तारखेपर्यंत किंवा या तारखेनंतर चे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र तयार ठेवावे. (महाविद्यालय प्रवेश वेळी आवश्यक नसले तरी नंतर शिष्यवृत्ती अर्ज भरतेवेळी आवश्यक आहे.

**टीप :-**

- प्रवेश घेते वेळी स्वतः विद्यार्थी हजर असणे आवश्यक आहे.
- प्रवेश फॉर्म वर **ABC ID** / **APAR ID** आवश्यक आहे.
- भ्रमणध्वनी (मोबाईल) व ई-मेल आयडी आवश्यक आहे
- सर्व प्रवेश प्रक्रिया महाविद्यालय प्रशासकीय कार्यालयातच होईल.
- कार्यालयात प्रवेश अर्ज जमा न केल्यास आपला प्रवेश रद्द समजण्यात येईल याची नोंद घ्यावी
- प्रवेश देणे वा नाकारणे महाविद्यालय प्रशासनाचा अधिकार राहील.
- विद्यार्थ्यांनी लिव्हिंग सर्टिफिकेट आणि १२ वी गुणपत्रकाची कलर प्रिंट काढून ठेवावी. नंतर शिष्यवृत्ती फॉर्म भरण्यासाठी आवश्यक आहे. प्रवेश निश्चित झाल्यावर कागदपत्रे परत दिले जाणार नाही.

***महत्वाचे : - विद्यार्थ्यांनी त्याचे सर्व कागदपत्रे स्कॅन करून त्यांचे PDF व JPG या format मध्ये तयार ठेवावेत ऐनवेळी शिष्यवृतीचे व विविध अर्ज भरताना सोयीचे होईल.***

| **प्रवेश समिती २०२६-२७** | |
|---|---|
| **विज्ञान शाखा** | **कला शाखा** |
| प्रा. एच.एम. बाविस्कर (चेअरमन)<br>प्रा. एस. बी. महाजन<br>प्रा. डॉ. जे. पी. नेहते | प्रा. डॉ. एम. के. सोनवणे<br>प्रा. व्ही. एच. पाटील<br>प्रा. अक्षय महाजन |

**प्राचार्य**
**डॉ. जे. बी. अंजने**

# महाविद्यालय निवडक क्षणचित्रे


















